## पारायण सुरू करण्यापुर्वी

(१) श्रीगुरूचरित्र सप्ताह करताना शक्य तो आरंभ शनिवारी करून शुक्रवारी संपवावा. सप्ताह सुरूवातीस,सप्ताह संपल्यानंतर व शक्य असल्यास संध्याकाळी श्रीगुरूचरित्राची पूजा व आरती करावी.

(२) श्रीदत्त- जयंतीचे उत्सवात ज्यांना श्रीगुरूचरित्राचा सप्ताह करावयाचा असेल त्यांनी समाप्ती जयंतीचे दिवशी न करिता, जयंतीच्या दिवशी केवळ चौथ्याच अध्यायाचे पारायण करून पुष्पवृष्टी वगैरे करून आनंद करावा.

(३) सप्ताहाचे सात दिवसांचा व्रतस्थपणा पदरात पडण्यासाठी समाराधना आठवे दिवशी करणे चांगले.

(४) जागा एकान्तात हवी. तशी नसेल तर श्रीदत्ताची मूर्ती असलेल्या मंदिरात सप्ताह करावा.

(५) उत्तरेस अगर पूर्वेस तोंड करून बसावे.

(६) शक्य नसल्यास घरी देवघरात सप्ताह सुरू करावा.

(७) अखंड दीप असावा. सप्ताह सुरूवातीपासून संपेपर्यंत तुपाचा दिवा असावा. ( वाचन चालू असेपर्यंत)

(८) समाप्तीचे दिवशी सुवासिनी व ब्राह्मण भोजन द्यावे.

(९) सात दिवसपर्यंत सोवळयाओवळयाचे निर्बंध पाळावेत.

स्त्रियांनी श्रीगुरूचरित्र वाचू नये असा श्री. प.पू. वासुदेवानंदसरस्वतींचा निष्कर्ष आहे. काही विशिष्ट हेतूसाठी विशिष्ट अध्याय नित्य वाचणारे लोक आहेत. आरोग्यसाठी तेरावा अध्याय, पारमार्थिक गुरूकृपेसाठी दुसरा अध्याय, सद्गुरूप्राप्तीची तळमळ व्यक्त होण्यासाठी पहिला अध्याय,संततीची आरोग्याबाबतची काळजी निवारण होण्यासाठी विसावा व एकविसावा अध्याय, पुत्रप्राप्तीसाठी एकोणचाळिसावा अध्याय. आकस्मिक अरिष्टनिवारणार्थ चौदावा अध्याय अशी त्या त्या अध्यायाची खास वैशिष्टये आहेत. ज्यांना सवड नसेल ते रोज अवतरणिका तरी वाचतात.

# पारायण पध्दत

## गुरूचरित्रसप्ताह किंवा पारायण अनुष्ठान करताना करण्याचा शास्त्रोक्त संकल्प, काही नियम व मंगलाचरण

आचमन, प्राणायाम व देशकालादिकांचा उच्चार झाल्यावर ज्या उद्येशाने हे अनुष्ठान करावयाचे असते त्याचा उच्चार करून म्हणजे देवतेला आपला हेतू निवेदन करून, त्या देवतेच्या कृपेने तो हेतू पूर्ण होण्यासाठी मी हे अमुक काम करतो असे म्हणून पाणी सोडावयाचे असते त्याला 'संकल्प' म्हणतात.

## आचमनादी झाल्यानंतर

श्रीमन्महागणाधिपतये नमः । मातापितृभ्यां नमः । इष्तदेवताभ्यो नमः । कुलदेवताभ्यो नमः । ग्रामदेवताभ्यो नमः । एकत्कर्मप्रधानदेवताभ्यो नमः । एवंगुणविशेषण विशिष्टायां शुभपुण्यतिथौ मम आत्मनः । श्रुतिस्मृतिपुराणोक्त - फलप्राप्त्यर्थं अस्माकं सकुटुंबानां सपरिवाराणां व्दिपदचतुष्पदसहितानां क्षेमस्थैर्यायुरारोग्यैश्वर्याभिवृद्धयर्थं च श्रीपाद - श्रीवल्लभ -
श्रीनृसिंहसरस्वतीदत्तात्रेयदेवताप्रीत्यर्थ सर्वारिष्टशांतिपूर्वक सकलमंगलवाप्त्यर्थं श्रीगुरू - चरित्र- सप्ताह पारायणं करिष्ये । तदंगत्वेन पुस्तकरूपी श्रीगुरूदत्तात्रेयपूजनं च करिष्ये । तथा आसनादि कलशशंखघंटादीपपूजनं च करिष्ये । ( असे म्हणून पाणी सोडून आसन, न्यास, कलशपूजा, तसेच शंख, घंटा, दीप यांची पूजा करून गुरूचरित्र पुस्तकाची पूजा
करावी व नंतर वाचण्यास आरंभ करावा. तत्पूर्वी घरातील देव व वडील माणसे यांना वंदन करून पुढील कार्यास अनुज्ञा घेऊन बसावे. सात दिवस पोथीपुढे अखंड दीप ठेवावा. वाचन चालू असेपर्य त तुपाचा दीप ठेवावा. )
ब्राम्हणाकडून संकल्प करून घेतल्यास फार उत्तम. ब्राम्हणास यथाशक्ति दक्षिणा द्यावी.

## सर्वसाधारण लोकांकरिता सोपा – संकल्प

( एवंगुण ) मम आत्मनः श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं मम मनोप्सितकाय-सिद्धयथ- श्रीपादश्रीवल्लभ -श्रीनृसिंहसरस्वती - दत्तात्रेय - देवता - प्रीत्यर्थं श्रीगुरूचरित्र - सप्ताह पारायणं करिष्ये इत्यादी वर दिल्याप्रमाणे.

## सप्ताह वाचीत असता लक्षात ठेवण्याच्या गोष्टी अथवा नियम

( १ ) सप्ताह वाचण्यास बसल्यानंतर मध्येच आसन सोडून उठू नये.
( २ ) दुस - याशी बोलू नये.
( ३ ) हविष्यान्न एक वेळ घ्यावे, संध्याकाळी फक्त दूध. हविष्यान्न म्हणजे दूधभात - मीठ, तिखट, आंबट काही नाही. दही – ताक नाही. साखर घ्यावी. गुळ घेऊ नये. गव्हाची पोळी ( चपाती ) तूप साखर घेता येते.

( ४ ) ब्रम्हचर्य
( ५ )भूमिशय्या म्हणजे पलंग किंवा खाटेवर निजू नये. गादी घेऊ नये. चटई किंवा पांढरे घोंगडे घ्यावे.

सप्ताहाच्या ७ वे दिवशी समाराधना करण्यास हरकत नाही. त्या दिवशी महानैवेद्य झालाच पाहिजे.श्रीगुरूचरित्र हा ग्रंथ महाराष्ट्रात वेदांइतकाच मान्यता पावलेला आहे. इ. सनाच्या १४ व्या शतकात मराठी लोकजीवनात नवा (सनातन परंपरेचा) प्राण ओतणारे दत्तावतार श्रीनृसिंहसरस्वती यांचे दिव्य व अद्‌भुत चरित्र विवरणारा हा ग्रंथ श्रीगुरूंच्या शिष्यपरंपरेतील श्रीसरस्वती गंगाधर यांनी १५ व्या शतकात लिहिला. श्रीगुरूंच्या चरित्रासारखा अलौकिक विषय व परंपरेचा वारसा लाभलेला श्रीगुरूकृपासंपन्‍न सिद्धानुभवी लेखक, असा योग जुळून आल्यामुळे या समग्र ग्रथांस सिद्ध मंत्राचे सामर्थ्य प्राप्त झाले आहे. हा ग्रंथ अत्यंत प्रासादिक आहे. संकल्पपूर्तीसाठीश्रीगुरूचरित्र वाचनाची विवक्षित पद्धती आहे. त्याप्रमाणेच वाचन, पारायण व्हावे असा सांप्रदायिक परंपरेचा संकेत आहे. स्वतः गुरूचरित्रकार म्हणतात.

, अंतःकरण असता पवित्र सदाकाळ वाचावे गुरूचरित्र ‘

अंतर्बाहय शुचिमूर्तता पाहून ह्या ग्रथांचे वाचन करावे. वैविध्यपूर्ण अशा संकल्पपूर्ततेसाठी गुरूचरित्राचे सप्ताह वाचनाचे अनुष्ठान निश्‍चित फलदायी ठरते, असा अनेक वाचकांचा व साधकांचा अनुभव आहे. या दृष्टीने अनुष्ठानाच्या काळात पाळावयाचे सामान्य संकेत वा नियम पुढीलप्रमाणे परंपरेने व सांप्रदायिक शास्त्राधाराने चालत आलेले आहेत. पूर्वीपासून प्रचारात असलेली श्रीगुरूचरित्राची ५३ अध्यायांची पोथी उपलब्ध आहे. परंपरेप्रमाणे
सप्ताह पारायण पद्धती खालीलप्रमाणे आहे.

पहिला दिवस - अध्याय १ ते ९ दुसरा दिवस - अध्याय १० ते २१
तिसरा दिवस - अध्याय २२ ते २९ चवथा दिवस - अध्याय ३० ते ३५
पाचवा दिवस - अध्याय ३६ते ३८ सहावा दिवस - अध्याय ३९ ते ४३
सातवा दिवस - अध्याय ४४ ते ५३

पुष्कळ वेळा तीन दिवसांचे पारायण करण्याची परंपरा आहे. त्या तीन दिवसांच्या अनुष्ठानासाठी अध्याय विभागणी पुढीलप्रमाणे -

पहिला दिवस - अध्याय १ ते २४ ( ज्ञानकाण्ड)
दुसरा दिवस - अध्याय २५ ते ३७ ( कर्मकाण्ड)
तिसरा दिवस - अध्याय ३८ ते ५३ ( भक्तिकाण्ड)

मूळ प्रतींची माहिती वरीलप्रमाणे असून दत्तभक्त श्री. रामचंद्र कृष्ण कामत यांनी मूळ पोथीवरून संशोधन केलेल्या श्रीमत् गुरूचरित्र या पोथीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

परमपूज्य श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामींचे कंठमणी असे श्रीमत् ब्रह्मानंदसरस्वतीस्वामी ऊर्फ ‘लीलादत्त’ यांच्याबरोबर श्रीगुरूभक्त रामचंद्र कृष्ण कामत, चंदगडकर हे शके १८४२ मध्ये गाणगापूर

येथे गेले. त्यांना संशोधनाची प्रबळ प्रेरणा मिळून त्यांनी ,श्रीमत् गुरूचरित्राची संशोधन प्रत ५२ अध्यायांची गुरूगीता अध्यायासह तयार करून पहिली आवृत्ती शके १८६२ मध्ये प्रकाशित केली. श्रीगुरू भक्त पारायण रा. कामत यांच्या श्रीगुरूचरित्र पोथीचे सप्ताह वाचन पद्धती खालीलप्रमाणे आहे.

(१) पहिला दिवस : अध्याय १ ते ७ पूर्ण एकूण १०६७ ओव्या.
(२) दुसरा दिवस : अध्याय ८ ते १८ पूर्ण एकूण १०६८ ओव्या.
(३) तिसरा दिवस : अध्याय १९ ते २८ पूर्ण एकूण १०४८ ओव्या.
(४) चवथा दिवस : अध्याय २९ ते ३४ पूर्ण एकूण ९८९ ओव्या.
(५) पाचवा दिवस : अध्याय ३५ ते ३७ पूर्ण एकूण ११५२ ओव्या.
(६) सहावा दिवस : अध्याय ३८ ते ४३ पूर्ण एकूण ११३५ ओव्या.
(७) सातवा दिवस : अध्याय ४४ ते ५१ पूर्ण एकूण ९२७ ओव्या.

नंतर अध्याय ५२ वाचावा ( एकूण ओव्या ७४९१)

श्री.प.पू. वासुदेवानंदसरस्वती महाराज (टेंबेस्वामी) यांच्या प्रतीनुसार वरील अध्यायक्रम दिला आहे. तसेच तीन दिवसांचे पारायण करण्याच्या अध्यायानुक्रम

(1) पहिला दिवस अध्याय २२ .(2) दुसरा दिवस ३६ पर्यंत (3) तिसरा दिवस अध्याय ५१ पर्यंत व अवतरणिका वाचावी.